
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY QUARTERLY
RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - II / English Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Scanned by TapScanner

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | युगानायिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर** | १-५ |
| २ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**प्रा. डॉ. भालेराव युलिसिस एकनाथ** | ६-९ |
| ३ | स्त्री शिक्षण<br>**गणेश वासुदेव पानझाडे**<br>**प्रा. अर्चना ज्ञानोब अडसुळे** | १०-१३ |
| ४ | सावित्रीबाई फुले आणि समाज परिवर्तन<br>**पल्लवी शेंडे** | १४-१६ |
| ५ | महिला सक्षमिकरणात राजा राजमोहन रॉय व महात्मा फुले या समाज सुधारकांचे योगदान<br>**प्रा. डॉ. आर. बी. शेटे** | १७-२० |
| ६ | स्त्री सक्षमीकरण<br>**डॉ. राजेश जानराव काळे** | २१-२५ |
| ७ | सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे अध्ययन<br>**प्रा. डॉ. आर. डी. इंगोले** | २६-२८ |
| ८ | आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले<br>**डॉ. राजेश शंकरराव पत्तीवार** | २९-३० |
| ९ | क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले - स्त्री स्वातंत्र्य हक्क<br>**डॉ. अशोक सोनकांबळे** | ३१-३३ |
| १० | स्त्री - जीवनाला नवी दिशा देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे** | ३४-३६ |
| ११ | सावित्री फुले आणि समाज परिवर्तन<br>**प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव** | ३७-४२ |
| १२ | स्त्रियांचे प्रेरणास्थान : सावित्रीबाई फुले<br>**डॉ. वर्षा चिखले** | ४३-४६ |
| १३ | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. सौ. यू. आर. पाटील** | ४७-५१ |




Scanned by TapScanner

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ११. सावित्री फुले आणि समाज परिवर्तन

**प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव**
गृहशास्त्र विभागप्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई, जि. बीड.

**गोषवारा**

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यार्ध्यात ज्यावेळी भारतासारख्या रुढीवादी परंपरा असणाऱ्या देशातस्त्रीला समाजात चुल आणि मुल एवढेच स्थान होते. अशावेळी स्त्रीयांना व बहुजन समजाला शिक्षणाच्या माध्यमातून एक नवी दिशा, नवसंजीवनी देण्याचे काम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. १ जानेवारी १९४८ साली मुलींची पहिली शाळाकाढून पुढे १८५२ सालापर्यंत एकुण १८ शाळा काढल्या यामध्ये अस्पृश्य,प्रौढ स्त्री - पुरुष इत्यादी साठी काढलेल्या शाळांचा समावेश आहे. तात्कालीन समाजातील बालविवाह, केशवपन, बालहत्या व स्त्रीभ्रुण इत्यादी अनिष्ट रुढी परंपराना नष्ट करण्यासाठी क्रांतीकारी कार्य केले. बाल विधवांचे केशवपन करुन त्यांना विदृप करण्याच्या अनिष्ट प्रथेला प्रतिबंध करण्यसासाठी नाव्हयांचा क्रांतीकारी संप घडवून आणाला. १८६३ साली बालहत्य प्रतिबंधक गृहाची स्थापना करुन विध्वा मातानां आत्महत्ये पासून व बाल हत्येपासून रोखुन त्याना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करुन दिली. त्यासाठी सावित्रीबाईनी विधवा मातांचे आईच्या मायेने स्व:त बाळंतपणे केली. व त्या लेकरांचे आईपण स्वीकारले. अस्पृश्यता निवारणासाठी आपल्या घरातील हौद अस्पृश्य लोकांसाठी खुला करुन दिला. सार्वत्रिबाईचे सर्व कार्य हे समाजिक समता प्रस्थापित करुन देणार होते. त्यंनी स्वत:च्या दत्तक मुलांचा आंतरजातीय विवाह करुन समाज परिवर्ताची वहिवाट निर्माण केली तसेच सत्यशोधक समाजाच्या कार्याच्या माध्यमातून समाजिक विषमता,जातीयता नष्टकरण्यासाठी समाजप्रबोधन केले. बालविवाहाला विरोध करुन पुर्नविवाहाचा अधिकार स्त्रीयांना मिळवून देण्यासाठी शेवट पर्यंत कार्य केले. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्य समाजकार्या मध्ये मग्न होत्या. आज समाजामध्ये झालेल्या परिवर्तनामुळे स्त्रीया विविध क्षेत्रात यशाची घोडदौड करत आहेत. समाजातील विविध अनिष्ट रुढी परंपरांना आळा बसल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या यशस्वी पावलामागे उंच भरारीमागे त्यंच्या प्रगतीमागे, सन्मानाने जगण्यामागे सावीत्रीबाईचे महान कर्तृत्व दडले आहे.

**प्रस्तावना**

समाज प्रबोधनाचे, समाज परिवर्तनाचे व समाज जागृतीचे महान कार्य करण्याचे माध्यम म्हणून शिक्षणाकडे पाहिजे जाते. कोणत्याही देशाची प्रगतीही त्या देशातील शिक्षणावरच अवलंबून असते भारतातील समाजिक, राजकीय, धार्मिक आणि चळवळ महत्वपूर्ण ठरलेली आहे. महाराष्ट्रातील विचारवंतानी आपल्या कृतीतून महाराष्ट्राला सुधारण्यासाठी शिक्षण हे माध्यम मानून अविरत कार्य केले. त्यामुळेच आजचा प्रगत समाज दिसत आहे. त्याचे अधिकांश श्रेय हे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले यांना जाते शिक्षणाच्या माध्यमातून बहूजन समाजाची देन्यावस्था संपवून, शिक्षणाची गंगा गोरगरीबांच्या झोपडीत पोहचविण्यासाठी समाज विकासाच्या अखंड प्रक्रियेमध्ये समाजात वैचारिकक्रांती



Scanned by TapScanner

घडवून आपल्या देशाला प्रगतीपथावर नेण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी निर्माण केलेल्या पाय वाटेचे पुढे राजमार्गात रुपांतर करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी महान समाज सुधारकांनी अविरत प्रयत्न केले एकोणिसाव्या शतकाच्या मध्यार्ध्यांत ज्यावेळी भारतासारख्या रुढीवादी परंपरा असणाऱ्या देशातस्त्रीला व बहूजन समाजाला कोणताही दर्जा नव्हता. अशावेळी त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून नवी दिशा, नवसंजीवनी देउवून समाज परिवर्तनाचे महान कार्य क्रांतीज्योति सावीत्रीबाई फुले यांनी केले.

**समस्यासुत्रण**

परदेशातून भारतात आलेल्या आर्यांनी परमेश्वराच्या नावाने चार वर्णांची निर्मिती करुन मूळ रहिवाशी भारतीयांना शुद्र वर्णात टाकले हया शुद्रांना म्हणजेच आजच्या बहूजन समाजाला ६००० जाती मध्ये विभागून त्याच्यांत उच्च नीचतेची विषारी भावना रुजविली बहूजन समाजाला दैववादी व अंधश्रध्दाळू बनविले व आपल्या भजनी लावले. काल्पनिक देवधर्माच्या स्वर्ग नरकाच्या व पाप - पुण्याच्या मोहजालात गरफटवून मानसिक व शारिरिकगुलाम गिरीत बहूजांनाना बंदिस्त केले. सुमारे पाच हजार वर्षापासून चालत आलेल्या या जाचक व अनिष्ट रुढी परंपरा मोडून समाज परिवर्तन करण्याचे कार्य देशातील अनेक थोर व्यक्तींनी केले. त्यापैकी एक असणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समाज परिवर्तन करणाऱ्या कार्याचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**संशोधन विधान**

सावित्रीबाई फुले आणि समाज परिवर्तन या अनुषगाने हा संशोधन विषय घेवून गेली पाच हजार वर्षापासून या देशात मनूवादी व्यव्स्थेने लादलेल्य जाचक व अनिष्ट रुढी परंपराना हल्ला चढवून सावित्रीबाईनी समाज परिवर्तनाचा जो लढा उभारला ज्यामुळे समाजात सामाजिक समानता प्रस्थापित झाली सावित्रीबाईनी देशाच्या समाजिक, राजकीय, शेक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन करण्यासाठी दिलेल्या मौलिक योगदानाचे अध्ययन करण्याचा अल्पसा प्रयत्न या टिकाणी करण्यात आलेला आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत शोधनिबंध लिहिण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

संशोधन कार्यात वस्तुनिष्टता येवून संशोधन् वास्तवाप्रत जाण्यासाठी संशोधणाची क्षेत्रमर्यादा निश्चित करावी लागते. सावित्रीबाई फुले आणि सामाजिक परिवर्तन या शोधनिबंधाची व्याप्ती सावित्रीबाईच्या परिवर्तनवादी कार्यापुरती मर्यादीत आहे.

**नमुना निवड**

प्राचीन काळापनासून भारतीय समाजातील अनष्टि रुढी ,, परंपरा नष्ट करुण बहुजनांना मानसिक व शारीरीक गुलामगिरीतून मुक्त करुन समाजपरिवर्तन करण्याचे काम अनेक महान विभूतींनी केले आहे. त्या सर्व परिवर्तवादी वीचारवंताचा अभ्यस करणे अशक्य आहे. म्हणुन समग्राचा लहानत लहान एकक म्हणुन सावित्रीबाई फुले यांचे



Scanned by TapScanner

समाजपरिवर्तनातील योगदानाचा नमूना म्हणून निवड करण्यात आला. सदर नमूना सहप्रयोजन नमूना निवडीच्या आधारे घेण्यात आला.

**तथ्य संकलनाची साधने**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी तथ्य संकलनकरताना दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला. या मध्ये विविध चरित्राग्रंथ संदर्भ , ग्रंथ, वर्तमानपत्रो, इंटरनेट इत्यदीचा समावेश करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिटे**

संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त करुन देण्यासाठी खालील उद्दिष्टांची निश्चिती करण्यात आली आहे.

१) सावीत्रीबाईचा जीवन परिचय अभ्यासणे.

२) सावित्रीबाई फुलेच्या कार्याचा आढावा घेणे.

३) सावित्रीबाई फुलेच्या कार्याची समाजपरिवर्तनातील उपयुक्तता अभ्यासणे

**संशोधनाची गृहितके**

१) सावित्रीबाई यांनी स्त्रीया, दलित, शोषित बहूजनाच्या प्रगतीसाठी व संरक्षणासाठी मोलाचे कार्य आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे.

२) आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी मध्ये सावित्रीबाई फुले यांचे मोलाचे योगदान आहे.

**माहितीचे विश्लेषण**

स्त्री मुक्ती अंदोलनाच्या आदयप्रेषित, स्त्री शिक्षणाची प्रणेत्या, ज्योतिरावांच्या सत्यशोधक मार्गात तोलमोलाची साथ देणारी क्रांती ज्योती, प्रतिभाशाली कवयित्री, स्त्री समाजातील भारतीय संस्कृतीचा आदर्श म्हणजे सावित्रीबाई फुले होय. सावित्रीबाईच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील त्याचा जन्म ३ जानेवारी १८३१ साली सतारा जिल्हयातील नायगाव येथे झाला इ.स. १८४० साली ज्योतिराव फुले यांच्याशी सावित्रीबाई विवाह वयाच्या नवव्या वर्षी झाला यावेळी ज्योतिरावांचे वय १३ वर्षे होते. सावित्रीचे सासरे गोविंदराव फुलेहे मुळचे फुरसुंगीचेक्षीरसागर, परंतू पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुल बागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येवून राहिले सावित्रीबाईचे पती ज्योतिराव यांना लहान पणापासून आईचे प्रेम लाभले नाही. त्यंचे पालन पोषण सगुणा आऊने केले. सगुणाआऊ एका इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुलाची दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी, कळायचे व बोलताही यायचे त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग ज्योतिरावांना प्रेरित करण्यासाठी केला, ज्योतिराव शिक्षणाकडे आर्कशित झाले त्यांनी स्वत: शिकुण सावित्रीबाईना शिकविले सुरवातीला विदयार्थ्यांनी, पुढे कवयित्री , शिक्षीका, मुख्याध्यापिका, नेता, शिक्षणतज्ञ, विचारवंत असा सावित्री बाईंचा झालेला प्रवास आणी विकास मनोज्ञ आहे ८.

**सावित्रीबाई फुलेच्या समाज परिवर्तनवादी कार्याची पार्श्वभूमी**

ज्या काळात भयानक अज्ञान, कर्मकांड, जातीभेद, वर्णभेद, बालविवाह, केशवपन,देवदासी, सतीची चाल, अज्ञान, स्पश्य -अस्पृश्य इत्यदी माहन व्याधीनी केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देश ग्रासला होता. स्त्री तर स्वतंत्र व्यक्तीमत्व मन



Scanned by TapScanner

भावना, विरोधाचा अधिकार, बुध्दी असते हे देखील नाकारले होते. स्त्रीया देखील प्रदीर्घ आघातामुळे आपले स्वत्व गमावून बसल्या होत्या स्त्रीयांचा जन्मच मुळी अशुभ मानला जाई स्त्री म्हणजे केवळ उपभोग्य वस्तू असून स्त्री व शुद्रांना विदयेचा अधि कार नव्हता स्त्री परतंत्र अथवा अबला आहे. विदयाभ्यासाने ती कुमार्गाला लागेल. ती दोषांची व अज्ञानाची खाण आहे. तिला शिकवले तर अकाली वैधव्य येते. स्त्री शिक्षण म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार स्त्रीने पायात वाहाण घालणेही अपवित्र थोडक्यात संपूर्ण समाज हा आर्थिक, समाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्व प्रकारच्या गुलामगिरीत खीतपत पडला होतो. त्याकाळात या सर्व भीषण महाभयंकर रोगांवर विदया हेच एक रामबाण औषध आहेहे माहत्मा फुले यांनी ओळखले व फुले दांपत्याने समाजसुधारणेचे कार्य शिक्षणाने आरंभिले.

**सावित्रीबाईचे शैक्षणिक कार्य**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन असल्यामुळे स्त्रीयांना शिक्षण घेता यावे म्हणून म. ज्योतीराव फुले यांनी १ जानेवारी १८४८ साली मुलींची पहिली शाळा पुण्यात काढली या शाळेच्या सावित्रीबाई हया प्रथम शिक्षीका आणि मुध्याध्यापिका झाल्या १५ मे १८४८ ला अस्पृश्यांसाठीआणखी शाळाकाढून १८५२ सालापर्यंत अशा शाळांची संध्या १८ पर्यं त नेलीहे शैक्षणिक कार्य करतअसताना सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांना अतोनात श्रम, हाल - अपेष्टा भोगाव्या लागल्य उच्च वर्णीयांकडून अवाच्चय शिव्या व शेणमातीचा मार सहन करावा लागला शिक्षणासंबंधी विचार मांडताना सावित्रीबाई फुले म्हणतात.

**शुद्रांनासांगण्याजोगा शिक्षणमार्गहा शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा**

माणसातील माणुसपण जागेकरुन, सुसंवाद वाढविण्यासाठी आणि माणसातील अंत कमी करण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्वाचे साधन आहे या देशातील दलित बहूजांनाच्या मुला - मुलींना शिक्षणाची संधी देवून हजारो वर्षापासून धर्माच्या देण्याचे सामर्थ्य या मुलांमध्ये निर्माझ केले. आज सावित्रीबाई च्या विदयार्थीनींचे नावे केंब्रीज , हार्वर्ड, ऑक्सफर्डला गाजत आहेत. आदय स्त्रीवादी लेखीका - विचारवंत ताराबाई शिंदे याचा स्त्री-पुरुष तुलना हा १८८२ सालाचा ग्रंथ केंब्रीजच्या डॉ. रोझ ालिंड डोहेल्नन यांनी इंग्रजीत भाषांतरित केला. तो ऑक्सफर्ड युनिव्हसीटी प्रेसने प्रकाशित केल्यानंतर अनेक पाश्चात्य संशोधकांचे व त्यामुळे भारतीयांचे अभ्यासकांचे लक्ष त्यांच्या कडे गेले. पहिल्या भारतीय महिला संपादक तान्हुबाई बिर्जे, आदय दलित लेखीका मुक्ता साळवे, पहिल्या दलित महिलासंपादक आणि नेत्या सावित्रीबाई रोडे या सर्व सावित्रीबाईच्या विदयार्थ्यांनीहोत्या. अशाप्रकारे शिक्षणाच्या माध्यमातून सावित्रीबाईंनी समाजपरिवर्तनाचे कार्य केले. त्यांचा काव्यफुले हा १८५४ साली प्रकाशित झालेला कवितासंग्रह ज्ञानार्जन, ज्ञान निर्मिती आणि ज्ञानप्रसार यांनाच वाहिलेला आहे.

**अनिष्ठ रुढी परंपरा पायबंद**

तात्कालिन समाजामध्ये सतीची चाल, देवदासी प्रथा बालविवाह विधवा विवाहास बंदी अस्पृश्यता इत्यादी अनिष्ठ रुढी व त्यांचे उदात्तीकरण करणाऱ्या धर्मग्रंथावर फुले दाम्पत्याने प्रखरहल्ला चढविला.



Scanned by TapScanner

**केशवपनावर बंदी व नाव्हयांचा संप**

सन १८९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र केवळ शुन्य ते चार वर्ष वयापर्यंत विधवा झालेल्या आईचे स्तनपान व सुटलेल्या निरागस बालिकांची संख्या १८७८ अशी होती तर चार वर्षाच्या पुढच्या वयाच्या बालिका किती असतील याची कल्पना करता येणार नाही अशा विधवा मुलींचे डोक्यावरील केसकाढून त्यंना विद्रुप केले जात असे. अशा मुक्या मुली आपल्या बापांना म्हणत असतील कि, मी तुमची लाडकी मला का करता बोडकी अशा बालविधवांचे विद्रुपीकरण थांबविण्यासाठी फुले दांपत्यांनी नाव्हयांचा ऐतिहासीक संप घडवून आणुन क्रांतीकारी कार्य केले.

**बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना**

बालविधवा वयात आल्यनंतर उच्चवर्णीय लोक त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेवून त्यांच्यावर अत्याचार करीत व त्यांना विधवा माता बनण्यास भाग पाडत. कित्येक विधवा स्त्रीया गर्भपात करुन घ्यायच्या किंवा आत्महत्या बालकांची हत्या होऊ नये म्हणून फुले दांपत्यांची बालहत्या प्रतिबंधक गृह १८६३ साली स्थापन केले होते. सावित्रीबाई स्वत: विधवा मातांचे बाळंतपण करायच्या अशाच एका काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवा मातेला आत्महत्येपासून परावृत्त केले. एवढेच नव्हे तर तिचे बाळंतपण करुन तिचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले व त्यास डॉक्टर बनविले व आपला एकुलता एक वारस जाहिर करुन आपली संपत्ती त्याच्या नावाने करुन दिली.

**अस्पृश्यता निवारणाच्या पुरस्कर्त्या**

सन १८६८ साली सावित्रीबाई फुले यांनी आपल्य घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. एवढेच नव्हे तर त्यांना पाणी भरण्यासाठी आनंदाने मदत केली.

**सत्यशोधक समाजाद्वारे समाजपरिवर्तन**

म. ज्योतीराव फुले यांनी धर्मातील अनिष्ट रुढी परंपरा कठोरहल्ला करुन अशा अनिष्ट रुढी परंपरांना फाटा देणारा बहुजन समाज हिताच्या सत्यशोधक समाजाची स्थापना केली याद्वारे समाजिक समतेचा संदेश समाजाला देण्यात आला. महात्मा ज्योतीराव फुलोंच्या निधनानंतर या समताधिष्टीत सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा सावित्रीबाईनी वाहिली आपल्या विचारांचा प्रसारत्यंनी आपल्या साहित्याच्यचा माध्यमातून केला काव्यफुले व वाबन कशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले सत्यशोधक समाजाच्या अनेक परिषदांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधन केले

**आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन**

सावित्रीबाईनी आपल्या संपूर्ण जीवन कार्यात सामाजिक समतेला केंद्रस्थानी ठेवले व समाताधिष्टीत समाजाच्या निर्मितीसाठी सातत्याने कार्य केले सावित्रीबाई फुले यांनी आपला दत्तक मुलगा यशवंत याचा विवाह ४ फेब्रुवारी १८८९ रोजी सत्यशोधक पध्दतीने लावला ज्ञानोबा ससाणे यांची द्वितीयकन्या राधा उर्फ लक्ष्मीबाई यांच्यासोबत यशवंताचा झालेला विवाह हा आधुनिक भारतातील पहिला आंतरजातीय विवाह होय.

याशिवाय सावित्रीबाईनी पुर्नविवाहाचा कायदा व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले इ.स. १८९६ सालीच्या दुष्काळा सावित्रीबाई समाजाला सत्कार्यांचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया - बापड्यांना दुष्ट तावडीतून सोडवून त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले.

**निष्कर्ष**

१) बहुजन समाजाला व स्त्रीयांना शिक्षणाची व पर्यायाने सत्व विकासाची संधी मिळावी यासाठी सावित्रीबाई फुले व ज्योतिराव फुले यांनी शाळा व वस्तीगृहाची स्थापना केली

२) बालविवाहाला विरोध करुन पुनर्विवाहाचा अधिकार स्त्रीयांना मिळावा यासाठी प्रयत्न केले.

३) केशवपन पध्दती बंद करण्यासाठी नाव्हांचा क्रांतीकारी संप घडवून आणून समाजपरिवर्तनाची नवी दिशा दिली.

४) विधवा मातांना आत्महत्यापासून रोखण्यासाठी व सन्मानाने जीवन जगण्यासाठी व बालहत्या रोखण्याच्या उद्देशाने बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

५) सत्यशोधकसमाजाची स्थापना करुन समाजिक समता देशातील जातीयता, सर्माजिक विषमता नष्टकरण्यासाठी समाजपरिवर्तनाचे कार्यकेले.

६) स्वत:च्या दत्तक मुलाचा आंतरजातीय विवाह लावून अस्पृश्यता निवारण्याचे कृतीशील उदात्त कार्य केले.

**संदर्भ**

१) झुंबरलाल कांबळे (१९९५) सावित्रीबाई फुले, सुगावा प्रकाशन, पुणे.
२) डॉ. दत्तात्रय मेंढेकर (२०१०) शिक्षणातील ज्ञानेश्वर, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद,
३) माळी मा. गो. (१९९७) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई
४) मातृश्री सावित्रीमाईची भाषणे (१८९२) प्रकाशन शास्त्रीमहाघाटवत्सल प्रेस बडोदा.
५) ना. ग. पवार, सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्व, पद्मगंधा, प्रकाशन
६) www.bookganga.com

Scanned by TapScanner